अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १५/१२/२०२४

## —: **प्रेसनोट** :—

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४२२/२०२४, खारघर पोलीस ठाणे, नवीमुंबई |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | १) राहूल परमेश्वर गरड, ३५ वर्ष, पो.शि.क्र. ०६५<br>२) निवृत्ती मानेजी कन्नेवाड, वरिष्ठ तुरूंग अधिकारी, नेमणुक - तळोजा मध्यवर्ती कारागृह, नवीमुंबई |
| लाचेची मागणी | रु. १०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. १०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचा भाऊ हा सन २०१८ पासून तळोजा मध्यवती कारागृह, नवीमुंबई येथे न्यायालयीन कोठडीत बंदी म्हणून आहे. दिनांक ११/१२/२०२४ रोजी तक्रारदार यांचे भावाने तक्रारदार यांना मोबाईलवर फोन करून सांगितले की, तुरूंग अधिकारी कन्नेवाड हे त्याला पैसे मागत असून पैसे न दिल्यामुळे त्याला खूप त्रास देत आहेत. तसेच दिनांक १३/१२/२०२४ रोजी त्याला सेशन कोर्टात घेवून जाणार आहेत, त्यापुर्वी तुरूंग अधिकारी कन्नेवाड व बाबाला (जेल अंमलदार राहूल गरड) यांना एक हजार रू. दयायचे आहेत असे सांगितले. त्यानंतर एका मोबाईल क्रमांकावरून तक्रारदार यांना दिनांक १२/१२/२०२४ रोजी पैशांबाबत व्हॉट्सअप मेसेज व कॉल आला. त्यानंतर नमूद मोबाईलवर तक्रारदार यांनी रू. १,०००/- गुगल पे केले व त्याची स्क्रीटशॉट त्या मोबाईलवर पाठवली. दिनांक १३/१२/२०२४ रोजी सदरबाबत ओके असा मेसेज आला व पुन्हा पैशांसाठी व्हॉट्सअप कॉल आला परंतू तक्रारदार यांना लोकसवकांस लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १३/१२/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष येवून सदर कारवाई ला.प्र.वि., मुंबई विभागाने करावी अशी विनंती करून लोकसेवकांविरूध्द तक्रार दिली.<br><br>नमूद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांच्याकडे लोकसेवक यांचेकरीत रू. १०,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्वरूपात मागणी करून ती स्विकारण्याचे कबूल केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १४/१२/२०२४ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ यांनी तक्रारदार यांच्याकडून रू. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारून त्याबाबत लोकसेवक क्र. २ यांना मोबाईलवर संपर्क करून सांगितले. त्यानुसार लोकसेवक क्र. २ यांना लोकसेवक क्र. १ यांचेकडून रू. १०,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून त्यांच्याविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :-** श्री. सोपान चिट्टमपल्ले, सहाय्यक पोलीस आयुक्त **पर्यवेक्षक अधिकारी :-** श्री रविंद्र बाबर, सहाय्यक पोलीस आयुक्त
**मार्गदर्शन अधिकारी :-** श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मनिषा झेंडे )
सहाय्यक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in
**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB
**मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net